**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -१३१४/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री.सुनिल कारंडे

सी-२/६, १:१ रिव्हीयर सोसयाटी

सेक्टर २२, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता (प्र.नि.) नवी मुंबई महानगरपालिका,
भुखंड क्र.१,किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता (प्र.नि.) नवी मुंबई महानगरपालिका,
भुखंड क्र.१,किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १५.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.४.२०२२ | ---- | १९.५.२०२२ | १५.६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि. २९.९.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त न झाल्यामुळे." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १५.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत विभाग कार्यालयामध्ये स्वच्छ सर्वेक्षणामध्ये सन २०१७ पासून ३१.३.३०२२ पर्यंत भिंत रंगविणे, पुतळे बसवणे इ. या कामासाठी दरवर्षी झालेला खर्चाचा विभागानिहाय EXCEL स्वरूपात माहिती व कागदपत्रे मिळावीत.)"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.६.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, *"अपिलिय अधिकारी यांनी माहिती अधिकारी तथा उप अभियंता (प्र.नि.) यांना संबंधित सर्व जन माहिती अधिकारी (स्थापत्य) (बेलापूर ते दिघा) अपेक्षिलेली माहिती अपिलकारास १५ दिवसांत माहिती उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात यावेत."* असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय अधिकारी हे त्यांना सुनावणीची नोटीस प्राप्त होऊनसुध्दा ते सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. सबब, माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (प्र.नि.), नवी मुंबई महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अविनाश जाधव, उप अभियंता (प्र.नि.), नवी मुंबई महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक१८.४.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून **त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून दि.१२.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता सादर करावा.** अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

**३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१२.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अविनाश जाधव, उप अभियंता (प्र.नि.),
नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.

**- यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (प्र.नि.) ,
नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई **यांचेमार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ